**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक ६ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **उत्तराखंडमधील ढगफुटीनंतर उत्तरकाशी जिल्ह्यातील धारली भागात मदत आणि बचाव कार्य युद्धपातळीवर सुरू**

2. **रिझर्व्ह बँकेकडून व्याजदर जैसे थे, महागाई दराचा अंदाज आणखी घटवला**

3. **नागपूर जिल्ह्यातील सातनवरी ठरणार देशातील पहिले स्मार्ट इंटेलिजंट गाव**

4. **जिल्हा परिषद आणि नगरपरिषदेच्या शाळांचे स्वरूप, आणि गुणवत्तेमध्ये आमूलाग्र बदल घडविणार-शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांचे भंडाऱ्यात प्रतिपादन**

-----------------------------------------

**उत्तराखंड पूर**

काल खिरगंगा नदीवर ढगफुटीमुळे आलेल्या विनाशकारी पुरानंतर उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यातील धारली भागात मदत आणि बचाव कार्य युद्धपातळीवर सुरू आहे. लष्कर, एनडीआरएफ, एसडीआरएफ, जिल्हा प्रशासन आणि इतर पथके बचाव कार्यात सतत गुंतलेली आहेत. बाधितांना तात्काळ मदत देण्यासाठी प्रशासनाने मदत छावण्यांमध्ये अन्न, पाणी, औषधे आणि निवाऱ्याची योग्य व्यवस्था केली आहे. खराब झालेल्या रस्त्यांमुळे भटवारी भागात रस्ते संपर्क तुटला आहे आणि उत्तरकाशी-हर्सिल मार्गावरील भूस्खलन दूर करण्याचे प्रयत्न जलद गतीने सुरू आहेत.दरम्यान, मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी आज आपत्तीग्रस्त भागांचे हवाई सर्वेक्षण केले आणि उत्तरकाशीमधील आपत्ती नियंत्रण कक्षात मदत आणि बचाव कार्याचा सविस्तर आढावा घेतला.

***(होल्ड बाईट - 27 सेकंद )***

***बचाव और राहत के काम में आईटीबीपी (ITBP) लगी है ,एनडीआरएफ (NDRF), एसडीआरएफ (SDRF) और स्थानीय लोग सभी लोग बचाव के काम में लगे हैं। कल लगभग 130 लोगों को रात को रेस्क्यू किया गया है और अभी लगातार***

***खोजबीन जारी है। काफी ज्यादा मौसम खराब होने के कारण से अनेक स्थानों पर मार्गों का संपर्क है। वह कट गया है।और कुछ पुल भी जो हैं छतिग्रस्त हो गए हैं। उसके कारण से वहाँ पर पहुंचना भी मुश्किल हो रहा हैं। लेकिन उसके बावजूद भी सभी एजेंसियां सभी लोग रेस्क्यू के काम में लगे हैं।***

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री धामी यांच्याशी फोनवरून संपर्क साधून मदतकार्याची माहिती घेतली आणि केंद्र सरकारकडून सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. मुख्यमंत्र्यांनी आभार व्यक्त केले आणि सर्व बाधितांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितल. दरम्यान, हवामान खात्याने येत्या काही दिवसांत राज्यात सतत पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवला आहे. दरम्यान उत्तराखंडमध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्हयांतील पर्यटक उत्तरकाशीमध्ये अडकले होते. हे सर्व पर्यटक सुखरूप असल्याची माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून देण्यात आली.

----------------------------------------

**कर्तव्य भवन**

पंतप्रधान  नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत कर्तव्यपथावर बांधण्यात आलेल्या कर्तव्य भवनाचं उद्‌घाटन झालं. सेंट्रल व्हिस्टा इमारत संकुलाचा व्यापक विस्तार करून कर्तव्यभवन ३ उभारण्यात आलं आहे. प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता आणि गतीमानता आणण्यासाठी बांधण्यात येत असलेल्या केंद्रिय सचिवालयांच्या इमारतींमधली ही पहिली इमारत आहे. या इमारतीत गृह, परराष्ट्र व्यवहार,ग्रामीण विकास, एमएसएमइ, तेल आणि नैसर्गिक वायू यासारख्या काही प्रमुख मंत्रालयांची कार्यालयं असतील.दरम्यान, यानिमित्त आज संध्याकाळी साडे सहा वाजता आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान उपस्थितांना संबोधित करतील.

----------------------------------------

**द्वैमासिक पतधोरण**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं द्वैमासिक पतधोरणात रेपो दरात कोणताही बदल केलेला नाही. रेपो दर साडे पाच टक्क्यांवर स्थिर ठेवण्यात आला आहे. बँकेच्या मुंबईत झालेल्या पतधोरण समितीच्या बैठकीनंतर, गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी ही माहिती दिली. महागाई कमी झाली असून, चांगल्या मान्सूनमुळे खरीप पिकांचं उत्पादनही चांगलं होण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसंच सध्याच्या जागतिक परिस्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल उत्तम राहण्याचा अंदाज व्यक्त करत, एकूण देशांतर्गत उत्पन्न अर्थात जीडीपी वाढीचा दर साडे सहा टक्के राहण्याचा अंदाजही मल्होत्रा यांनी वर्तवला.

-----------------------------------------

**अजित डोवाल**

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल उद्या रशियात मॉस्को इथे वरिष्ठ रशियन अधिकाऱ्यांबरोबर भारत-रशिया सुरक्षा सहकार्यावर चर्चा करण्यासाठी बैठक घेणार आहेत. रशियाकडून तेल खरेदी केल्यामुळे भारतीय वस्तुंवर २५ टक्के कर वाढवण्याचा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. त्या पार्श्वभूमीवर ही बैठक होणार आहे. या बैठकीत डोवाल रशियाकडून इंधन तेल खरेदी तसंच पंतप्रधान मोदी आणि अध्यक्ष पुतिन यांच्या आगामी बैठकीविषयी चर्चा करणार आहेत.

-----------------------------------------

**सातनवरी**

आरोग्य, शिक्षण यासोबतच शेतीसाठी स्मार्ट सिंचन, ड्रोनद्वारे किटकनाशके व खत फवारणी, मत्स्यव्यवसाय, बँक ऑन व्हिल, स्मार्ट निगराणी व्यवस्था आदी महत्वाच्या डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित सुविधांनी सुसज्ज असे नागपूर ग्रामीण मधील सातनवरी हे देशातील पहिले गाव तयार होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने नावारूपाला येत असलेल्या या अनोख्या गावात गेल्या महिन्याभरापासून कामाला सुरूवात झाली आहे. येत्या 8 ऑगस्ट रोजी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या टिमसह या गावाला भेट देवून प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेणार आहेत.कैंद्रीय दूरसंचार मंत्रालयांतर्गत कार्यरत व्हाईस ऑफ इंडियन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी एंटरप्रायजेसने देशांतर्गत कंपन्यांच्या संघटनांसोबत एकत्र येत देशातील स्मार्ट इंटेलिजंट गाव बनविण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समक्ष ठेवला व त्यास तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देत हा महत्वाकांक्षी प्रकल्प महाराष्ट्रात राबविण्याचे ठरले. त्यानुसार व्हाईस कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांची भेट घेतली. विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासोबत बैठक होवून नागपूर ग्रामीण मधील सातनवरी या 1800 लोकवस्तीच्या गावाची निवड देशातील हा प्रायोगिक प्रकल्प राबविण्यासाठी झाली व त्यास मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली.

-----------------------------------------

**दादा भुसे**

राज्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी सरकार कटीबद्ध असून, येत्या एक वर्षात जिल्हा परिषद व नगरपरिषदेच्या शाळांचे स्वरूप

आणि गुणवत्तेमध्ये आमूलाग्र बदल घडवणार असल्याचा विश्वास राज्याचे शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी व्यक्त केला. आज भंडारा जिल्ह्याची शैक्षणिक गुणवत्ता आढावा बैठक जिल्हा परिषदेच्या सभागृहात पार पडली, या प्रसंगी ते बोलत होते. भंडारा जिल्ह्यातील काही जिल्हा परिषद शाळांना अद्याप मान्यता न मिळाल्याबाबत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, स्व:ताचे अधिकार वापरून प्रकरण निकाली काढावे, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. तसेच, शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता भासू नये म्हणून 'पवित्र पोर्टलद्वारे भरती प्रक्रियेचे काम सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली. राज्यातील सर्व शाळांमध्ये राष्ट्रगीतानंतर राज्य गीत गाणे बंधनकारक आहे आणि खाजगी शाळांमध्येही मराठी शिक्षण अनिवार्य असतील, असे ठासून सांगत, संबंधित शाळांवर निरीक्षण करताना हे तपासण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. जर कोणी नियमांचे उल्लंघन करत असेल, तर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा या बैठकीप्रसंगी त्यांनी दिला.

-----------------------------------------

**प्रदर्शन**

नागरिकांना जलदव सुलभ न्याय मिळण्याकरिता भारत सरकारने लागू केलेल्या नवीन कायदेविषयक माहितीजाणून घेण्यासाठी नागरिकांनी प्रदर्शनाला आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्रन्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा यांनी आज अमरावती येथे केले.माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारच्या केंद्रीय संचार ब्युरो,क्षेत्रीय कार्यालय, अमरावती, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावती,जिल्हा प्रशासन, अमरावती, जिल्हा परिषद,अमरावती, पोलिस आयुक्त कार्यालय, अमरावती,पोलिस अधीक्षक कार्यालय, अमरावती, जिल्हा माहिती कार्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती येथे आयोजित केलेल्या नव्या भारताचे नवे कायदे, भारतीय न्यायसंहिता 2023 या विषयावरील मल्टिमीडिया छायाचित्र प्रदर्शनाचेउद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

-----------------------------------------

**हवामान**

विदर्भात नागपूर सह गोंदिया, भंडारा , चंद्रपूर , गडचिरोली , अमरावती, वाशीम जिल्ह्यात काही ठिकाणी मेघगर्जनेसह वादळाची आणि हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता तसच यवतमाळ आणि वर्धा जिल्ह्यात ही हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे.

-----------------------------------------

**'हर घर तिरंगा'**

"आजादी का अमृत महोत्सव" अंतर्गत 'हर घर तिरंगा' अभियान 2 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट दरम्यान राज्यात राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे विविध उपक्रम घेतले जात असुन काल पीएम श्री सावित्रीबाई फुले प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळेत रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत 4 वी ते 9 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन देशभक्तीपर, तिरंगा, राष्ट्रध्वज, अशोकचक्र, पोस्टर, रांगोळी यांसारख्या विविध संकल्पनांवर आधारित सुंदर रांगोळ्या रेखाटल्या.

---------------------------------------